**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्र. शैगुवा-२०१६/प्रक्र.(१८१/१६)/एसडी-६,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०६ डिसेंबर, २०१६.

**परिपत्रक**

राज्यातील जवळपास सर्वच शिक्षक WhatsApp ग्रुपच्या माध्यमातून एकमेकांशी जोडले गेले आहेत. राज्यात डिजीटल शाळा व तंत्रस्नेही शिक्षक यांची कामगिरी वाखाणण्याजोगी आहे. वीजेची किंवा इंटरनेटची सुविधा सुद्धा उपलब्ध नाही अशा अत्यंत दुर्गम, विखुरलेल्या वाड्या, वस्त्या, पाड्यावर, आदिवासी क्षेत्रातही शिक्षकांनी संपूर्ण शाळा समाजाच्या सहभागातून डिजीटल केल्या आहेत. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांनाही टॅबलेट उपलब्ध करून दिले आहेत. ४५,७३५ शिक्षक तंत्रस्नेही झाले आहेत. त्यांनी २,३०६ शैक्षणिक ॲप्स्, जवळपास ५०,००० पेक्षा जास्त शैक्षणिक व्हिडीओज् तयार केले आहेत. १,९९२ होतकरू शिक्षकांनी स्वत: संकेतस्थळ / ब्लॉग्ज्ची निर्मिती केली आहे. यामधील काही संकेतस्थळावर २५ GB पेक्षाही जास्त शैक्षणिक माहिती E-Content च्या स्वरूपात सर्वांसाठी उपलब्ध आहे.

२) शिक्षकांनी विषय व घटकनिहाय तयार केलेले शैक्षणिक व्हिडीओज्, WhatsApp, ई-मेल, संकेतस्थळांच्या माध्यमातून इतरांना उपलब्ध करून दिले जात आहे. शिवाय बरेचसे शिक्षक स्वत:हून ई-शैक्षणिक साहित्याची निर्मिती करत आहेत.

३) तसेच अनेक संस्थांच्या संकेतस्थळावर विविध विषयांचे ई-साहित्य सर्वांसाठी खुले आहे. अशा काही संकेतस्थळांची यादी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या दि. २२ जून, २०१५ च्या शासन निर्णयात नमूद करण्यात आली आहेत.

४) शिक्षकांनी त्यांचा जास्तीत जास्त वेळ अध्ययन-अध्यापनासाठी उपयोगात आणावा यासाठी त्यांनी स्वत: वरीलप्रकारची निर्मिती करण्याऐवजी परिच्छेद क्र. २ व ३ मध्ये नमूद केलेल्या ई-साहित्याचा प्रभावी वापर केल्यास १०० टक्के मुले जलदगतीने प्रगत होतील. तरीसुद्धा स्वनिर्मितीचा आनंद हा वेगळाच असतो. तो आनंद घेण्यासाठी साहित्य निर्मिती करण्यास हरकत नाही.

५) शिक्षकांनी कोणते ई-साहित्य वापरावे, ते कसे शोधावे यासाठी शिक्षकांना वेळ, ऊर्जा, श्रम व निधी खर्च करावा लागतो. शिक्षकांच्या या बाबीच्या बचतीकरिता राज्य शासनाने एकस्टेप या संस्थेसोबत चर्चा करून इंग्रजी, गणित, भाषा व तंत्रस्नेही शिक्षक यांच्या माध्यमातून पाठ्यपुस्तकातील धड्यांवर आधारित निर्मिती करण्याचे नियोजन केले आहे. या माध्यमातून सर्व शिक्षकांना पाठ्यपुस्तकातील धड्यांवर आधारित ई-साहित्य एकस्टेप संस्थेच्या https://community.ekstep.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहे.

एकस्टेप या संकेतस्थळाचे इतर फायदे खालीलप्रमाणे आहेत-

५.१) गणित, विज्ञान, भाषा या विषयासाठीचे उपक्रम उपलब्ध आहेत.

५.२) वरील कार्यशाळेस संबोधित करणारी प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांची ध्वनीचित्रफित वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

५.३) Google Play Store वरून Ekstep Genie हे Application डाऊनलोड करता येते. या Genie चे वैशिष्ट्य असे की, त्याच्या माध्यमातून वापरण्यात येणारे साहित्याचे सर्वेक्षण आपोआप होत राहते. तसेच ते एकदा डाऊनलोड केले की ऑफलाईनसुद्धा वापरता येते.

५.४) या संकेतस्थळावर शिक्षकांचे गट करता येते. त्या गटात संख्येची मर्यादा नाही. त्यामुळे राज्यातील सर्व शिक्षकांचे एकच गट विषयनिहाय, तालुकानिहाय, जिल्हानिहाय, केंद्रनिहाय, इत्यादी गट करता येतात. याचा फायदा गटातील इतर शिक्षक सदस्यांशी चर्चेत सहभागी होणे, त्या माध्यमातून शैक्षणिक चर्चा करता येणे, विचारांची देवाण-घेवाण करता येणे, संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या साहित्याचा उपयोग आवश्यकतेनुसार अध्ययन-अध्यापनात उपयोग करता येणे हे सगळे शक्य आहे.

६) वरील संकेतस्थळावर व Application वर उपलब्ध असलेले ई-साहित्य, शैक्षणिक व्हिडीओज्चा शिक्षक वापर करत आहेत याची माहिती प्रणालीच्याद्वारे शासनास पाहता येणार आहे. जास्तीत जास्त शिक्षक याचा वापर करत आहेत किंवा कसे हे प्रणालीमधून दिसून येणार आहे. शिक्षकांना त्याचा फायदा होत असल्यासच ते त्यामध्ये सहभागी होतील. अर्थात कोणत्या साहित्याचा वापर शिक्षक अधिक करत आहेत हे शासनाच्या लक्षात येईल. त्यानुसार शासन या संकेतस्थळ / Genie Application वरील ई-साहित्याचा वापर, गट चर्चा यामधील सहभाग, तज्ज्ञांकरवी नवीन साहित्य निर्मिती करून अपलोड करणे, इत्यादीबाबतचा निर्णय घेईल.

पुढील काळात राज्यातील सर्व शाळांमधील सर्व वर्ग डिजीटल करण्यात येणार आहेत. डिजीटल इंडिया या कार्यक्रमांतर्गत सर्व शाळांमध्ये वाय-फाय सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मुलांना सुलभ व जलदगतीने शिकण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वरील संकेतस्थळावरील ई-साहित्य सर्व शिक्षकांना निश्चितच उपयुक्त ठरेल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा सांकेतांक क्रमांक २०१६१२०७१२२७०३६९२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c818668168cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2016.12.07 12:29:35 +05'30'

**( डॉ. सुवर्णा सि. खरात )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, राजभवन, मुंबई यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.

३. प्रधान सचिव, नगर विकास विभाग / सामाजिक न्याय / आदिवासी विकास विभाग / ग्रामविकास विभाग
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. सर्व संचालक, शिक्षण विभाग.
७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
८. सर्व आयुक्त, महानगरपालिका.
९. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी.
१०. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उपसचिव.
११. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१२. सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यवसायिक विकास संस्था.
१३. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषद (सर्व).
१४. शिक्षण निरीक्षक, दक्षिण / उत्तर / पश्चिम बृहन्मुंबई.
१५. शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व).